**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** धुळे **P.S.(ठाणे):** देवपूर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0160 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 22/04/2026 00:20

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार
   **Time Period (कालावधी):** पहर 6
   **Date From (दिंनाक पासून):** 21/04/2026
   **Date To ( दिंनाक पर्यंत):** 21/04/2026
   **Time From (वेळेपासून):** 16:57 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 18:53 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 21/04/2026 **Time (वेळ):** 23:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 035

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 21/04/2026 23:43 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** धुळे शहरातील जयहिंद चौकातील ,आनंद टी हाउस समोर ,रस्त्यालगत धुळे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** यशवंत बोरसे पोलीस निरीक्षक

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1987

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे,देवपूर,धुळे,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे,देवपूर,धुळे,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9527427065

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | कैलास रामदास तेले | | | 1. 2,अक्षय कलनी, गोदुर रोड,, धुळे,देवपूर,धुळे,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/ रु. दराच्या 56 चलनी ना◌ेटा | 28,000.00 |

10.**Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

28,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी यशवंत विश्वनाथ बोरसे, वय 38 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे समक्ष पोलीस स्टेशनला हजर राहुन फिर्याद देतो की, आम्ही ला.प्र.वि. धुळे येथे पो.नि. या पदावर सुमारे 08महिन्यापासुन कार्यरत आहोत. दि.27.01.2026 रोजी आम्ही कर्तव्यावर हजर असतांना पोलीस उप अधी. श्री साळुंखे यांनी कार्यालयात हजर असलेले तक्रारदार चंद्रकांत धनराज म्हस्के यांची तालुका कृषि विभागातील लोकसेवक लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार असुन त्याबाबत पुढील कार्यवाही करणेबाबत आदेशित केल्याने आम्ही मा. सहायक आयुक्त, समाज कल्याण विभाग, धुळे यांना पत्र देवुन त्यांचेकडील दोन शासकिय कर्मचारी सतिश मोहन निकम, शिपाई व राजेश मधुकर काळे, वरिष्ठ लिपीक यांना उपलब्ध करुन घेतले. तेव्हा आम्ही त्यांना आमची यशवंत बोरसे, पो.नि.,ला.प्र.वि., धुळे अशी ओळख देवुन त्यांची ओळख करुन घेतली. तसेच कार्यालयात हजर असलेले तक्रारदार चंद्रकांत धनराज म्हस्के व पोका ॅ. बारेला यांची ओळख करुन दिली.

त्यानंतर आम्ही तक्रारदारास त्यांचे नांव गांव विचारता त्यांनी त्यांचे नांव चंद्रकांत धनराज म्हस्के, वय. 41 वर्ष, व्यवसाय. ठिबक मटेरियल विक्रेता, फर्म श्री दत्त इरिगेशन एजन्सीस रा. चांदपुरा चौक, शिरुड ता.जि. धुळे असे सांगुन त्यांनी त्यांचे तक्रारीची तोंडी हकीगत सांगितली, त्यानंतर तक्रारदार यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांची तक्रार कार्यालयातील संगणकावर टंकलिखीत करण्यात आली ती माझे श्री. दत्त इरिगेशन एजन्सीस, खांडबारा ता. नवापुर, जि. नंदुरबार नावाने रजिष्टर फर्म असुन त्याची मौजे शिरुड ता.जि,धुळे येथे ठिबक सिंचन मटेरियल विक्रीची शाखा आहे. त्याचा GST No- 27CQWPM7278L1ZL असा आहे. माझे दुकानातुन परिसरातील शेतकरी ठिबक सिंचनाचे साहित्य खरेदी करीत असतात तसेच शासकीय अनुदान योजनेतुन देखील ठिबक सिंचनाचे साहित्य खरेदी करीत असतात. सदर शासकीय अनुदान योजने अंतर्गत खरेदी केलेल्या शेतकऱ्यांनी ठिबक सिंचनाचे शासकीय अनुदान मिळणेकरीता महाडीबीटी या पोर्टलवर शेतकऱ्यांनी ऑनलाईन अर्ज केलेले असतात.

माझे दुकानातुन ठिबक सिंचनाचे साहित्य खरेदी केलेल्या शेतकऱ्यांचे ठिबक सिंचनाचे साहित्याची शेतात जोडणी केल्याची पडताळणी (मोका तपासणी) कृषि पर्यवेक्षक श्री. तेले यांनी करुन त्यांच्या फाईल मंडळ कृषि अधिकारी कार्यालय, पिंप्री यांच्या लॉगींगला पाठविल्या आहेत.

त्यानंतर सुमारे 7/8 दिवसापुर्वी कृषि पर्यवेक्षक श्री. तेले हे शिरुड येथील माझे दुकानावर येवुन त्यांनी मला ''तुमच्या दुकानातुन ठिबक सिंचनचे साहित्य खेरेदी केलेल्या शेतकऱ्यांच्या ठिबक सिंचनाच्या साहित्याची जागेवर जावुन शेतात जोडणी केल्याची मोका तपासणी करुन मंडळ कार्यालयास पाठविली आहे, तुम्हाला त्या मोबदल्यात मला 35,000 /- रुपये दयावे लागतील, नाहीतर तुमच्या शेतकरी ग्राहकांची मोका तपासणी फाईलीत त्रुटी काढेल'' असे सांगितले. तेव्हा मी माझे दुकानाचे शेतकरी ग्राहक तुटून माझे व्यायसायिक नुकसान होण्याच्या भितीने त्यांना 10,000/- रुपये दिले आहेत. त्यानंतर ते वारंवार माझेकडे उर्वरीत 25,000/- रुपये लाचेची मागणी केल्याची तक्रार दिली. सदर तक्रार वाचुन तक्रारी अर्जावर व त्यासोबतच्या कागदपत्रांवर आम्ही व दोन्ही पंचांनी सहया केल्या आहेत.

त्यानंतर तक्रारदार यांनी आम्हास ''कृषी पर्यवेक्षक कैलास तेले यांनी मला आज रोजी त्यांनी सांगितल्याप्रमाणे पैसे घेवुनच भेटण्यास सांगितले आहे, मी पैसे घेवुन गेलो नाही तर त्यांना माझेवर संशय येईल'' असे सांगितले. तेव्हा आम्ही त्यांना सांगितले की, आपल्या तक्रारीची पंचांसमक्ष पडताळणी केल्याशिवाय आपणास सापळा कारवाई करता येत नसुन कृषी पर्यवेक्षक कैलास तेले यांना त्यांच्या मोबाईलवर फोन करुन पडताळणी कारवाई करावी लागेल असे सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार व पंचांशी चर्चा करुन कृषी पर्यवेक्षक कैलास तेले यांना पंचांसमक्ष फोन करण्यास सांगुन पडताळणी करण्याचा निंणय घेण्यात आला.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचेशी चर्चा करुन तक्रारदार यांना त्यांच्या मोबाईलवरुन स्पिकर सुरु करुन कृषी पर्यवेक्षक तेले यांना फोन करण्यास सांगितले. तेव्हा आमचे सुचनेवरुन पोकॉ. रामदास बारेला यांनी डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु केले. तेव्हा तक्रारदार यांनी पंचांसमक्ष त्यांच्या मोबाईलवरुन मोबाईलवरील स्पिकर सुरु करुन कृषी

पर्यवेक्षक कैलास तेले यांना त्यांच्या मोबाईलवर फोन केला असता त्यांचेत तक्रारदार यांच्या कामाबाबत चर्चा झाली. चर्चे दरम्यान कृषी पर्यवेक्षक कैलास तेले यांनी यापुर्वी 10,000/- रुपये दिलेले आहेत, आता 30,000/- रुपये द्यावे लागतील शेतकऱ्यांच्या फाईलला काही अडचण येणार नाही असे तक्रारदार यांना सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी काहीतरी कमीजास्त करा असे कृषी पर्यवेक्षक कैलास तेले यांना सांगितले असता त्यांनी तडजोडीअंती तक्रारदार यांचेकडे 28,000/- रुपये लाच स्विकारण्याचे मान्य करुन तक्रारदार यांना त्यांच्या घरी येण्यास सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी घरी नको बाहेर भेटू असे त्यांना सांगितले. तेव्हा त्यांनी त्यांचे घरी कोणीतरी आलेले आहे, तुम्हाला फोन करतो असे तक्रारदार यांना सांगितले. सदरचे संभाषण डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्ड मध्ये फाईल नं. 1 मध्ये ध्वनीमुद्रित केले. त्यानंतर आम्ही मोबाईलद्वारे करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाहीतील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरी कार्डमध्ये तक्रारदार चंद्रकांत म्हस्के व कृषी पर्यवेक्षक तेले यांचेत झालेले ध्वनीमुद्रित संभाषण आम्ही तक्रारदार व दोन्ही पंचांच्या उपस्थितीत एकुन कृषी पर्यवेक्षक तेले यांनी तक्रारदार यांच्याकडे 30,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 28,000/- रुपये स्विकारण्याचे मान्य केल्याची आमची सर्वांची खात्री झाली.

त्यानंतर तक्रारदार यांनी सापळा कारवाईकामी 28,000/- रुपये त्यात 500/- रुपये दराच्या 56 चलनी नोटा हजर केल्या सदर नोटांना पावडर लावुन सापळापुर्व कार्यवाही करुन लाचेची रक्कम तक्रारदार यांच्या पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवुन दिली. त्यानंतर आम्ही, तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकातील पोलीस अंमलदार असे कृषी पर्यवेक्षक कैलास तेले यांच्या फोनची प्रतिक्षा करीत धुळे ला.प्र.वि. कार्यालयात थांबुन होतो. बराच वेळ होवुनही कृषी पर्यवेक्षक कैलास तेले यांचा तक्रारदार यांना फोन न आल्याने आम्ही तक्रारदार यांना त्यांच्या मोबाईलवर स्पिकर सुरु करुन कृषी पर्यवेक्षक कैलास तेले यांना फोन करण्यास सांगितले असता कृषी पर्यवेक्षक कैलास तेले व तक्रारदार यांचेत पंचायत समिती कार्यालयाजवळ भेटण्याचे ठरले. तेव्हा आम्ही, पंच नं. 02, पोलीस उप अधीक्षक साळुंखे, पोकाॅ. प्रविण पाटील असे खाजगी कारने तसेच तक्रारदार, पंच नं. 01 व पोकॉ. मकरंद पाटील असे तक्रारदार यांच्या कारने ला.प्र.वि. धुळे कार्यालयातुन रवाना होवुन पंचायत समिती कार्यालयाकडे जात असतांना पांझरा नदीच्या पुलावर असतांना तक्रारदार यांनी त्यांची कार थांबवुन खाली उतरुन त्यांना कृषि पर्यवेक्षक कैलास तेले यांचा फोन येत असलेबाबत आम्हास सांगितले. तेव्हा आम्ही तक्रारदार यांना त्यांच्या मोबाईलचा स्पिकर सुरु करुन कृषि पर्यवेक्षक कैलास तेले यांचा फोन रिसिव्ह करण्यास सांगितले असता कृषि पर्यवेक्षक कैलास तेले यांनी तक्रारदार यांना जयहिंद चौकात येण्यास सांगितले. तेव्हा आमचे सुचनेवरुन पोकॉ.मकरंद पाटील यांनी तक्रारदार यांच्याकडे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार यांच्याकडे देवुन तक्रारदार व पंच नं. 01 यांना तक्रारदार यांच्या कारने जयहिंद चौकात कृषि पर्यवेक्षक कैलास तेले यांची भेट घेण्यासाठी रवाना केले. त्यांच्या पाठोपाठ आम्ही, पंच नं. 02 व सापळा पथक असे खाजगी कारने रवाना झालो. तेथे पोहोचल्यावर आम्ही सापळा लावला. तक्रारदार यांनी जयहिंद चौकातील इंदिरा गार्डन ते मोचीवाडा रस्त्यालगत असलेल्या अमोल टी हाऊसच्या समोरुन ठरवुन दिलेला ईशारा केला. तेव्हा सापळा पथक त्यांचेजवळ पोहोचलो. तेव्हा पोकॉ. मकरंद पाटील यांनी तक्रारदार यांचेकडील डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतले. तेव्हा आम्ही पंच नं. 1 यांना विचारणा केली. तेव्हा पंच नं. 1 यांनी समोरच उभे असलेल्या इसमाकडे इशारा करुन ते कृषि पर्यवेक्षक तेले असल्याचे सांगुन त्यांनी ''मी व तक्रारदार असे तक्रारदार यांच्या कारने जयहिंद चौकात आलो. तेव्हा तक्रारदार यांची जयहिंद चौकात भेट झाली. तेव्हा कृषि पर्यवेक्षक कैलास तेले यांनी तक्रारदार यांना चहा घेवु असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांची कार रस्त्याच्या कडेला लावुन तक्रारदार, कृषि पर्यवेक्षक कैलास तेले व मी असे तेथे समोरच असलेल्या आनंद टी हाऊस येथे चहा पिण्यास गेलो. तेथे कृषि पर्यवेक्षक कैलास तेले व तक्रारदार यांच्यात चर्चा झाली. चर्चे दरम्यान तेले यांनी हाताच्या इशाऱ्याने तक्रारदार यांना पैसे देण्याचा इशारा केला. तेव्हा तक्रारदार यांनी कृषि पर्यवेक्षक कैलास तेले साहेब किती रुपये झाले अशी विचारणा केली. तेव्हा कृषि पर्यवेक्षक कैलास तेले यांनी अठठावीस असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी देवुन टाकु का? अशी विचारणा करुन त्यांच्या पॅन्टच्या उजव्या खिशातील ठेवलेली लाचेची रक्कम काढुन तेले यांच्या समोर धरली असता तेले यांनी तक्रारदार यांना मोजले आहे का? असे विचारले, तेव्हा तक्रारदार यांनी त्यास होकार दिला. तेव्हा तेले यांनी लाचेची रक्कम त्यांच्या डाव्या हाताने स्विकारुन त्यांच्या पॅन्टच्या डाव्या खिशात ठेवुन घेतली. तेव्हा तक्रारदार यांनी ठरवुन दिलेला इशारा केला.'' अशी हकिगत सांगितली. तेव्हा आमचे सुचनेवरुन पोकाॅ. मकरंद पाटील यांनी तेले यांना ताब्यात घेतले. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पंच नं. 2 राजेश काळे यांनी तेले यांनी त्यांच्या पॅन्टच्या डाव्या खिशात ठेवलेली लाचेची रक्कम काढुन सापळापुर्व कार्यवाही दरम्यान कागदावर लिहीलेल्या नोटांच्या क्रमांकाशी पडताळणी करुन लाचेच्या रकमेची खात्री केली. त्यानंतर तक्रारदार यांच्या तक्रारीवरुन झालेल्या संपुर्ण कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

अशा प्रकारे तक्रारदार चंद्रकांत धनराज म्हस्के यांनी त्यांच्या श्री. दत्त इरिगेशन एजन्सीस, शिरुड येथील दुकानातुन

ठिबक साहित्य खरेदी केलेल्या शेतकऱ्यांचे शेतात ठिबक साहित्य जोडणी केल्याची पडताळणी (मोका तपासणी) करुन त्यांच्या फाईली मंडळ कृषि अधिकारी कार्यालय, पिंप्री यांच्या लॉगीनला पाठविल्याच्या मोबदल्यात कैलास रामदास तेले, वय 49 वर्षे, कृषि पर्यवेक्षक, तालुका कृषि कार्यालय, पिंप्री, ता.जि. धुळे यांनी तक्रारदार यांच्याकडुन 30,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 28,000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य करुन आज रोजी सापळा कारवाई दरम्यान धुळे शहरातील जयहिंद चौकात आनंद टी हाऊस समोर रस्त्यालगत पंचासमक्ष तक्रारदार यांचेकडुन 18:39 वाजता 28,000/- रुपये लाचेची रक्कम स्वत: स्विकारुन त्यांनी स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी भ्रष्ट व बेकायदेशिर मार्गाचा अवलंब करून अनाधिकाराने पदाचा दूरूपयोग केला म्हणुन त्यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिंबध अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे माझी कायदेशिर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Samadhan Mahadu Wagh(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**:**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव)**:**

**District** (जिल्हा)**:**

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) **.**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Samadhan Mahadu
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**

पोलीस ठाणे अंमलदार
देवपूर पोलीस स्टेशन